| MHSO070007482007 | **नियमित दरखास्त क्र. ४८/२००७ मधील नि.क्र.११८ वरील आदेश**<br>(भानुदास मांजरे व इतर वि. पिराजी राघु मांग व इतर)<br>(पारीत दिनांक – १८/०४/२०२६) |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने/धनकोने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. २ड काजल भिमराव खंडाळे व प्रतिवादी क्र. ३ड रणजित भिमराव खंडाळे हे सज्ञान झाले आहेत. त्याबाबत त्यांचे बोनाफाईड अभिलेखाव दाखल आहे. त्यामुळे सदर अज्ञानापुढे अनुक्रमे वय २७ व २५ वर्षे असे लिहून व तशी दुरूस्ती दरखास्तीमध्ये करण्यास परवानगी मागितली आहे.

२. प्रतिवादी/ऋणकोतर्फे सदर अर्जाला म्हणणे दिले असून त्यांनी प्रस्तुत अर्ज नामंजुर करावे अशी विनंती केली आहे.

३. युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतची दरखास्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता दाखल केला आहे. वादीने त्याच्या कथानाच्या पृष्ठ्यार्थ नि. क्र.११७ वर शपथपत्र दाखल केलेले आहे तसेच सदर प्रतिवादी क्र. २ड काजल भिमराव खंडाळे व प्रतिवादी क्र. ३ड रणजित भिमराव खंडाळे यांचे बोनाफाईड सर्टीफिकेट दाखल केलेले आहेत. महत्वाचे म्हणजे, प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास दरखास्तीचे स्वरुप बदलणार नाही व सदर नियोजित दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही असे मला वाटते. त्याचप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांच्या मधील वाद हा कायमस्वरुपी मिटविण्याकरीता सदरची दुरुस्ती ही आवश्यक असल्याचे दिसुन येते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** वादीचा निशाणी क्र. ११८ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तुतची दुरुस्ती ही १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्तीची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

KANCHAN JAYWANT KHOMANE

Digitally signed by KANCHAN JAYWANT KHOMANE
Date: 2026.04.18 16:27:14 +0530

(के.जे. खोमणे)

दिनांक – १८/०४/२०२६.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर, जि. सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A.B. Sandrok |
| Court | - | 2nd Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 18/04/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 18/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 18/04/2026 |